# प्रकरण तिसरे

# दादासाहेब मोरे यांच्या ‘गबाळ’ मधील लेखनाची प्रेरणा व स्वरुप

# प्रकरण ३ रे

# दादासाहेब मोरे यांच्या 'गबाळ' मधील लेखनाची प्रेरणा व स्वरुप.

माणसाला आपले दु:ख, आनंद केंव्हातरी का होईना, कुणाला ना कुणाला सांगावेसे वाटते. अंतर्मनात, मनाच्या गाभाऱ्यात कुठल्यातरी कप्प्यात खदखदत असणारे, उन्मळून, उचंबळून येणारे बाहेर पडण्यास उत्सुक असलेले सांगितले म्हणजे आपण भोगलेले, सोसलेले व जे काही मिळवले, ते मिळवत असताना असह्य झालेले जीवन, वेदना सोसताना व मिळवताना जो मानसिक व भावनिक ताण त्याच्यावर पडलेला असतो. तो कुठेतरी हलका झाल्याचे भासते. वास्तविक अनुभवाला आले ते सर्वोत्परी एकट्याचे असते. परंतु या सांगण्यामुळे हलके हलके वाटण्याची एक मानसिक अवस्था त्याला भासमान होते. यातील अनुभव आणि वेदना अतिशय जहरी असतात. भूतकाळ आठवून तसे कोणतेही सुख लाभत नसते हे जरी खरे असले 'सांगावेसे वाटणे' ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. म्हणूनच दादासाहेब मोरे म्हणतात, 'मला जेव्हापासून समजायला लागलं तेंव्हापासूनची, मी ज्या जमातीत जन्माला आलो त्या भटक्या जमातीची दु:ख, व्यथा, वेदना व त्यांची समाजात होत असलेली उपेक्षा, त्यांचं जीवन मी आपणासमोर उभं करण्याचा प्रयत्न केला आहे.' पृ. १

अशा निवेदनाला, अनुभव कथनाला जेव्हा अक्षर रुप प्राप्त होते तेव्हा एका साहित्यकृतीचा जन्म झालेला असतो. म्हणूनच, 'हकीगत' या आत्मकथनात्मक लेखनाची लेखनपूर्व अवस्था सांगताना प्रा. केशव मेश्राम म्हणतात, 'आता मीच स्वत:पुढे स्वत:ला उभा करणार होतो परक्या डोळ्यांनी त्रयस्थपणाने, जमेल तितके माझ्याकडे पाहणार होतो'. [१] गबाळ या आत्मकथनाची जातकुळी बघताना याच दृष्टीने विचार करावा लागतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, म. फुले, भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे इ. पुरोगामी समाजसुधारकाच्या प्रयत्नाने तळागाळातील समाज हळूहळू जागृत होत गेला. शिक्षणाच्या दालनात त्यांनी प्रवेश केला, त्यामुळे त्यांची अस्मिता जागवली आपल्या दैन्यमय, दरिद्री, भणंग, लाचार जीवनाचे त्यांना भान आले. विशेषत: धर्मांतरामुळे दलित समाजाला आत्मभान आले. लेखणीचे सामर्थ्य कळाले. त्यामुळे ते लिहू लागले. साचलेले, तुंबलेले, भोगलेले, सोसलेले, आज्ञानाचे, दारिद्याचे संचित त्यांच्याजवळ होते. प्रतिभा, कलात्मकता, वाङ्मयीन सौंदर्य, लय वगैरेच्या मोहात ते अडकून न राहता त्यांनी लिहिले, वेदनाचे कढ, अंगार कागदावर आले. 'मी कुठून, कोणातून, कसा आलो' ? या संवेदनाशील मनाला वारंवार पडणाऱ्या प्रश्नातून दलित आत्मकथने लिहिली जाऊ लागली. म्हणून प्रा. माटे म्हणत असत की, 'महार मांगादी तळागाळातील माणसे आपले अनुभव साहित्यातून सांगू लागतील तेव्हा मराठी साहित्य अधिक पुष्ट, अधिक प्रातिनिधिक, वास्तव असे झालेले असेल'. [२]

'गबाळ' हे कुडमुडे जोशी समाजातील दादासाहेब मल्हारी मोरे या तरुणाचं आत्मकथन आहे. कुडमुडे जोशी ही भटक्या जमातीपैकी एक जात असून पोटासाठी त्यांना गावोगावची भटकंती करावी लागते. एका घोड्यावर सारा संसार लादून सतत फिरत असलेला, भविष्य सांगण्याच्या नावाखाली लोकांना खोटं बोलून भीक मागण्याचा यांचा धंदा म्हणजे जन्मजात भिकारी असणाऱ्या पोटपाठीशी लागलेल्या जातीचे चित्रण, दु:ख, वेदना यात वर्णन केलेले आहे. याच जातीतील एक मुलगा शिकतो, शिकवतो, कुटुंबाबरोबर भटकून माणसे जगविण्याचा प्रयत्न करतो, गटारी साफ करतो, आईचे कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन करण्यासाठी समाजप्रवाहाच्या विरोधातील एक नवी सुधारणा घडवून आणतो. माणसासारखा माणूस असूनही जनावरासाखा मार खातो पण यासाठी हताश न होता समंजसपणा सारासार विचार करुन आयुष्याची वाट चालत राहतो आपल्या दु:खाला शब्दबध्द करण्याइतपत तो सुजाण होतो त्याची ही आत्मकहाणी आहे.

या आत्मकथनातील प्रेरणांचा विचार करीत असताना, सर्वप्रथम आपणाला एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे त्यांनी, त्यांच्या समाजानी वर्षानुवर्ष सहन केलेल्या, सोसलेल्या, अनुभवलेल्या दु:खाची वेदना होय.

१) **वेदना** - या आत्मकथनातून 'कुडमुडे जोशी' या समाजाची वेदना साकार झालेली आहे. वर्षानुवर्ष हा समाज दरिद्री, भणंग, लाचार, अज्ञानी राहिला त्यामुळे त्याला दारिद्याचे जीवन जगावे लागते. म्हणून लेखकाला वाईट वाटते, म्हणून लेखक म्हणतो, 'एखाद्याला सांगायचे सुख निर्माण करतो, तुझ्या संपत्तीत बरकत आणतो, तुझ्या मुलांनी तुझ ऐकावं अस करतो, तुझ्या घरातील भांडण मिटवतो पण यासाठी जीवदान म्हणून कोंबडी पाहिजे'. अडाणी, अंधश्रध्देने ग्रासलेले लोक त्याच ऐकून त्यांना जीवदान देतात,' [१६] स्वत: फसतात व दुसऱ्यालाही फसवतात अशा प्रकारे आपल्या समाजाची जीवनप्रणाली अशीच किती काळ राहणाार, आपला समाज असा का वागतो, सवर्णसमाजातील माणसे विचार का करीत नाहीत ? पांडुरंग आजोबा आजारी असताना मागायला गेले, उन्हातून चालत आले त्यामुळे त्यांना कासावीस होऊन ते बेशुध्द पडले तेंव्हा गंगूमावशीने झुटिंगाला नैवेद्य टाकायला सांगितला म्हणून लेखक म्हणतात, औषध पाणी न करता गंगू मावशीच्या जोरावर आमचा समाज किती दिवस राहणार ?

यानंतर आपल्या समाजाची वेदना व्यक्त करताना लेखक कुंभारी गावचा प्रसंग सांगतात या गावी आल्यानंतर पावसातच विमल बाळंत झाली, मुलगा झाला म्हणून माणसं आनंदीत झाली 'काहीच दिसत नव्हत एकादेखील पालात दिवा नव्हता आरडा ओरड सुरु झाली बाबजी मामा म्हणत होता, आर ये मचिंदरा .... पुरीला नीट संभाळ पालात पाणी येईल बघ .... वली बाळातीन हाय' लेखकाचे वडील मच्छिंद्र शिंदेना सांगत होते 'वझं भवतीनं लावून पुरीला मदी ठिव' सूचनावर

सूचना होत होत्या विमलच्या अंगाखाली पाणी आलं विमल हळू आवाजात लक्ष्मी आत्याला म्हणाली 'आय पाणी कुठतरी आंगाखाली आलंया... थंड वाजा लागलय' लक्ष्मी आत्याने हाताएवढा बाळ जीव हातात घेतला. लाचार समाजाची दु:ख त्याला आईच्या उदरातून आल्या आल्या भोगावी लागत होती.'[१५७] अशा प्रकारे आपल्या दु:खाला वाचा फोडताना हे जीवन असेच किती दिवस चालणार हा मोठा प्रश्न लेखकासमोर पडला आहे.

यानंतर इतर समाज आम्ही माणसासारखी माणसे असताना जनावराप्रमाणे आम्हाला वागवतो याबद्दलची वेदना व्यक्त करताना लेखक सलगरे गावचा प्रसंग सांगतात. सलगरे गावी लेखक व त्याचे लहान बंधु आब्बास भीक मागत होते. हातातली ताटली भरली होती पण आशा वाईट असते. आणखीन दोन - चार तुकडे मिळावे म्हणून ते मागत राहिले. तेवढ्यात पाठीमागून एक कुत्रे येऊन चावले, रक्त वाहू लागले मिळवलेल्या भाकरी मातीत मिसळून गेल्या, पायातील वेदनेमुळे कापरे भरले तरी वस्तीवरील माणूस म्हणत होता की, 'आयला या भिकाऱ्याच्या पोरास्नी काय कामच नसतंया, थाटल्या हातातनं घेत्याती अन् मागाला पळत्याती, बरं झालं कुत्रं चावलं.... पुन्यांदा हाकडं कोण याच न्हाय'.[१६६] लेखकाला त्या माणसाचा भयंकर राग आला कारण भीक मागण्याची माणसाला हौस नसते ती परिस्थिती असते पण याचा विचारच कोणी करत नाही. यानंतर बावची गावचा प्रसंग लेखकाने वर्णन केला आहे. या गावातील आमीन पाटील लेखकाच्या वडिलांचे मित्र होते. आमीन पाटील लेखकाच्या घरी नेहमी जेवण करीत परंतु आषाढाच्या पाच - सहा दिवसात ते जेवत नसत. मरगम्मा देवीला बळी दिलेला प्राणी ते खात नसत त्यांचा देव वेगळा ही देवाची विभागणी या समाजने का केली ? एक सारखी माणसे असताना देव मात्र वेगवेगळे का ?

यानंतर लेखकाने जत मधे शिकत असतानाचा एक प्रसंग वर्णन केलेला आहे. जतमध्ये शिकत असताना दुष्काळामुळे मानकाईने डबा देण्याचे बंद केले. एकीकडे खर्जेने सर्वांग व्यापले होते. दुसरीकडे उपासमार सुरु होती म्हणून आईवडिलांच्या शोधार्थ ते 'मंगसूळी' या गावी आले. आईवडीलांची भेट न झाल्यामुळे ते तेथेच मारुतीच्या देवळात झोपले तेंव्हा तो पुजारी येतो व चौकशी करतो तेंव्हा लेखकाने 'मी जोश्याचा हायं लोकं पुड गेलीतं ... त्यांना शोधतोय' असे सांगताच पुजारी एकदम बिथरला आणि 'जोश्याचा हाय आन मोठा श्याणाच दिसतुयास' असे म्हणून तेथून हकलून दिले म्हणून लेखक म्हणतात, 'का म्हणून या जातीत जन्माला घातले आहेस त्यापेक्षा कुत्र्याच्या जन्माला घातले असतेस तर फार चांगले झाले असते'.[१३८] हा विचार व्यक्त करुन या संस्कृतीतील माणूसकी हिनता ते आपल्या नजरेला आणून देतात. खरे तर लेखक त्या मंदिरात झोपल्यामुळे मंदिर ढासळणार नव्हते. देव पळून जाणार नव्हता किंवा गावाला महापूर येणार नव्हता पण पुजाऱ्याने मात्र हाकलून दिले होते.

अशा प्रकारे लेखकाने 'स्व' बरोबरच 'स्वसमाज' व त्याची वेदना साकार केलेली आहे. ✓

२) **प्रचंड अज्ञान -** 'गबाळ' मधील जीवन प्रवास पाहता वाऱ्यासारखे जीवन जगणाऱ्या आणि गावो गावी भटकणाऱ्या कुडमुडे जोशी समाजाच्या हाल अपेष्टा व अज्ञानी समाज जीवनाचा प्रवास आहे. पोट पाठीला बांधून आपले गबाळ घोड्याच्या पाठीवर टाकून पोटाला मिळेल त्या दिशेने हे फिरतात. पोट भरेल ते आपले गाव मानतात. अशा घरात राहून ही प्रत्येकजण आपल्या स्वतःचे मोठेपण दाखवण्याचा प्रयत्न करीत असतो.

दिवस उजाडण्यापूर्वी भिक्षा मागायची अनं सकाळ नंतर ज्योतिषी म्हणून भविष्य सांगावयचे हे पुरुषाचे कार्य तर दुसऱ्या बाजूला स्त्रिया जळण गोळा करणे, लीद, शेण गोळा करणे अशी कामे करतात. मुलांना ही मागायला पाठविले जाते. आलेले धान्य विकून तेल - मीठ भागवितात. 'भांबा' आणि 'हडप' ही त्यांची भिक्षेची साधने असून पंचाग सांगून कोंबडी मिळवितात. भिक मागणे झाल्यावर ओढ्यावर जाऊन मासे, खेकडे पकडतात. अर्थ व्यवहार फारसा यांना कळत नाही. एका गावात मागून झाले. दुसऱ्या गावाला जायचे आकरा महिने गावोगाव असेच भटकायचे व आषाढाच्या महिन्यात गावी येऊन मरगंम्मा देवीची यात्रा करायची मिळविलेले सगळे घालवायचे आणि पुन्हा पोटासाठी चालू लागायचे त्यामुळे हा समाज इतर समाजापासून, शिक्षणापासून, औद्योगिकीकरणापासून, शासनाच्या सोई सवलतीपासून खूप दूर आहे. विचार परिवर्तन, जाणीव जागृती, होत नाही त्यामुळे प्रचंड अज्ञा या समाजात असल्याचे दिसून येते.

३) **भणंग आणि लाचार जीवन -** दादासाहेब मोरे यांनी आपल्या लेखनातून आपल्या समाजाच्या भणंग, लाचार, अज्ञानी, दरिद्री आणि स्वाभिमान गहाण टाकून जीवन जगणाऱ्या समाजाचे व्यथा शब्दबध्द केली आहे. ही व्यथा शब्दबध्द करताना कुठेही प्रस्थापितावर द्वेष, तिरस्कार, जळजळीत दुष्टीक्षेप न टाकता संथपणे एक लयीत त्याला आकार दिला आहे. आपल्या समाज जीवनाचं चित्रण करताना ते म्हणतात " दोन काटयावर पोती टाकून तयार केलेलं पाल म्हणजे त्याचं घर. पाला समोर तीन दगड ठेवायचे, रानातून लाकडं गवऱ्या गोळा करून आणावयाच्या आणि त्या तीन दगडा मध्ये घालून पेटवायचे तीच त्याची चूल त्या दगडावर मग एखादं भगुलं ठेवायचे, थोडेसे पाणी त्या भगुल्यात घालून थोडासं गूळ घालून चहाची पावडर कधी नसायची, कोणाकडं असली तर बरं, नाही तर पेरूचा पाला कोठून तरी तोडायचं आणि त्या भगुल्यात घालायचा. थोडा थोडा जाळ लावायचा की झाला

चहा... पालाच्या समोरचं एक दगड आणून ठेवायचा आणि त्यावर बसून आंघोळ करायची बायकानी देखील तिथेचं अंघोळ करायची त्याना लाज वाटायची नाही. बहुतेक त्याच्या जीवनाच्या हिशोबात लाजेचं खातचं उघडलं नाही. नागडी, शेबंडी पोरं खेळायची, भांडायची, रडायची'[१२] दारोदार भीक मागयचे कुणी एका थोबाडीत दिली तर दुसरे थोबाड पुढे करायचे जाब विचारायचा नाही, सवर्णाच्या लग्नात आशाळभूतपणे उकिरड्यावर वाढणाऱ्याची वाट पाहत थांबायची, दारु पिऊन झिंगायचे, आजारी पडल्यावर मरीआई, म्हसोबा, येताळ इ. खाजे द्यायचे. हागणदारीतच रहायचे. प्रस्थापित न्याय व्यवस्था नाकारुन दांडी - मांडीचा न्याय मांडून दारु पिऊन तर्रर व्हायचे. कर्ज काढून यात्रे जत्रेत मेंढरु बकरे कापायचे आणि कुटुंबातील उत्पादनाच्या प्रमाणात नसणारी संतती देवाचे देणे समजून वाढवीत रहायचे.

४) **अखंड भ्रमती :** 'गबाळ' हे आत्मकथन मुळातच दु:खाचे गबाळ आहे. यातील दादासाहेब निमित्तमात्र आहे. धर्मभोळ्या अंधश्रध्दाधारक माणसांना लबाड बोलून गुजराण करणारा हा समाज स्व:तच धर्मभोळा व अंधश्रध्दा बाळगणारा आहे. व पोटासाठी वणवण भटकणारा आहे. वर्षातून अकरा महिने गावोगाव हिंडायचे प्रत्येक गावात भिक मागयचे आणि हिंडत रहायचे. आषाढाच्या महिन्यात गावी यायचे आणि वर्षभर जमा केलेले दारु पिऊन, मांस खावून, चैन मौज मजा करुन संपवायचे आणि पुन्हा लाचार होऊन भटकायचे. गबाळ मध्ये सलगरेहून आरग तेथून मालगाव, घोरपडी, नागज, कुमठे, बाज, नंदेश्वर, परत बावचीहून पुन्हा शिरनांदगी, कुंभारी, शेगाव, खिळेगांव, पुन्हा सलगरे, बेळंकी, वाडेगांव मार्गे आंधळगांव, जुनोनी, सलगरे, बेडग, टाकळी, मिरज, खंडेराजूरी अशाप्रकारे पुन्हा पुन्हा पोटासाठी गावोगांव चालत रहायचे. एका गावात वस्ती करायची नाही, कारण उदरनिर्वाहासाठी निश्चित व्यवसाय नाही. आणि व्यवसाय करावा म्हटले तर त्याचे ज्ञान नाही, आर्थिक पाठबळ नाही. म्हणून गळ्यात भांबा अडकावून हातात वर्षानुवर्ष एकच असणारे पंचाग घेवून स्व:तची घोर फसवणूक करीत. हा समाज भ्रमती करतो आहे. याचे दु:ख लेखकाने येथे व्यक्त केले आहे.

५) **अनिष्ठ रुढी आणि परंपरा :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकासाच्या अनेक योजना आखल्या गेल्या, शाळा महाविद्यालय निघाली, औद्योगिकीकरणाचा वेग न मोजता येणाऱ्या गतीने वाढला पण अजूनही समाज जीवनाच्या या प्रवाहात तळागाळातील समाज सामील होत नाही. याचे कारण म्हणजे या समाजातील अज्ञान अनिष्ट रुढी परंपरा आणि शिक्षणाचा अभाव हेच होय.

एके दिवशी नेहमीप्रमाणे भ्रमती करीत असताना वृध्द पांडूरंग वायफळकरांना चक्कर आली आणि ते बेशुध्द पडले. सर्व मंडळी रडू व ओरडू लागली, त्यावेळी तिथेच असणाऱ्या गंगू मावशीच्याअंगात आले, तेंव्हा तिने रस्त्यातील झुटिंगा काढून दिल्या. याप्रमाणेच दर वर्षी आषाढ महिन्यात हा समाज आपल्या गावी जाऊन मरगम्मा देवीची यात्रा करतो. त्यावेळी बोकड, मेंढी, कोंबडी कापायची रक्ताचा सडा पाडायचा, भरपूर दारु प्यायची आणि ही मुख्य जत्रा झाल्यानंतर पाल जत्रा ही कोंबडं, बोकडं कापून साजरी करायची. याप्रमाणे मंगळवारी गाव सोडता येत नाही, म्हणून प्रसंगी स्मशानातच वस्ती करायची. लहान मुलाप्रमाणेच नवरदेवालही व्हरी बसवायचे. अशाप्रकारे या समाजातील भयावह अशा रुढी परंपरांचे दर्शन आपणाला घडते.

६) **कष्टमय स्त्री जीवन :** दलित समाजात स्त्री हा एक महत्त्वाच घटक आहे. पुरषापेक्षा स्त्रियांनाच अधिक दु:खे वाट्याला आलेली आहेत. अनेक दलित आत्मकथनातील स्त्रीप्रमाणेच गबाळ मध्येही दादासाहेब मोऱ्यांची आई कष्टाने वाकलेली आहे. दरवर्षी एका अपत्याला ते जन्म देते. कुटुंबाबरोबर वणवण हिंडते. दादासाहेबाच्या आईप्रमाणेच त्यांच्या आजीचीही हिच आवस्था आहे. तिला संभाळण्याचे तिच्या मुलांनी जेंव्हा नाकारले तेंव्हा ती अत्यंत शांत असल्याचे दिसते. कोणते प्रत्युत्तर तिने केले नाही. या आजीप्रमाणेच दादासाहेबाची मानकाई वैधव्याचे जीवन जगते. छोट्या छोट्या वस्तुचा व्यापार करीत ती हिंडते. दुष्काळात रोजगार हमीच्या कामावर जाते. गबाळाबरोबर हिंडत असतानाच विमल बाळंतीण होते. त्यावेळी मुसळधार पाऊस पडत असतो. बाराव्या वर्षीच मुलीचे लग्न लावले जाते. अश्याप्रकारे या समाजातील कष्टमय स्त्री जीवनाचा परिचय आपणाला होतो.

७) **संघर्षमय दैनंदिन जीवन :** गबाळ मधील जीवनाचा आलेख विचारात घेत असताना, या समाजातील संघर्षमय दैनंदिन जीवनाचे चित्र आपल्या समोर उभे राहते. या समाजाला उदनिर्वाहासाठी गावोगाव हिंडावे लागते. त्यावेळी ऊन, पाऊस, वारा या घडामोडीशी तर संघर्ष करावाच लागतो. पण इतर समाजाबरोबर संघर्षाला तोंड द्यावे लागते, हागणदारीत रहावे लागते. कारण नसताना पोलिस अधिकारी त्रास देतात. कुटुंब नियोजनाचे लोक त्रास देतात म्हणून रानावनात रहावे लागते. भीक मागताना एखाद्याचे कुत्रे चावले तर त्या कुत्र्याला साधा दगड ही मारता येत नाही. आपल्याजवळील धान्य अल्प किमतीत व्यापाऱ्याला द्यावे लागते. या समाजातील लहान मुलांना शाळा शिकायला गेल्यावर 'भिकाऱ्याची पोरे' म्हणून शाळेबाहेरच बसावे लागते. रोजगारहमीवर अर्ध्यापगारात राबावे लागते.

अशा या संघर्षमय सामुहीक जीवनाबरोबरच या समाजातील वैयक्तिक जीवनही असेच संघर्षमय असल्याचे आपणाला दिसून येते.

८) **भाषिक वेगळेपणा :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गावोगावी शाळा, महाविद्यालय, एस.टी., रेल्वे, पोस्ट खाते, दुरदर्शन, दळणवळणाच्या सोई सुविधा पोहोचल्या. परंतू अजूनही स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपणाला समजला नाही. कारण अजूनही आपल्या देशात प्रचंड प्रमाणात अज्ञान, दारिद्रय, अनारोग्य , शिक्षणापासून दूर असणारा समाज, अनिष्ठ रुढी, परंपरा, व्यसनाच्या चक्रात अडकलेला समाज वास्तव्याला आहे. हा समाज विकासाच्या प्रक्रियेत येत नाही. त्याला त्यांच्याप्रमाणेच इतर समाज योजनांची अंमलबजावणी करणारे निरनिराळ्या स्तरावरचे शासकिय अधिकारी जबाबदार आहेत, असे म्हणावे लागते.

'कुडमुडे जोशी' हा समाज वर्षानुवर्ष अज्ञान, अंधार, दारिद्रयात, नागरी जीवनापासून खूप दूर राहिलेला समाज आहे. भविष्य सांगून भिक मागून उदर निर्वाह करण्याचा व्यवसाय यांनी पत्करला आहे. इतर समाजापासून दूर असतानाही या समाजाने स्वःची एक संस्कृती जतन करुन ठेवलेली आहे. आपल्या समाजाचे वेगळेपण यातूनच त्याने राखले आहे. आपले व्यवहार आपल्या भाषेतून तो करतो. मध्यम वर्गीयापासून किंवा नागरी जीवनापासून तो जाणिवपूर्वक दूर राहतो. कारण त्यांची एक वेगळी संस्कृती आहे, त्यामागे एक विशिष्ट संकेत आहे. संकटकाळी तो आपली भाषा वापरतो. याचे वर्णन करताना. दादासाहेब मोऱ्यांनी वाडेगावच्या सावकाराच्या चोरीचे वर्णन केलेले आहे. यागावातील सावकाराची जेंव्हा चोरी झाली, तेंव्हा जाब विचारण्यासाठी पोलिस येतात. तेव्हा 'चिंगडी गासुकली टुळका' या भाषेत या समाजाने संवाद साधला आहे. म्हणजे पोलिस आले लपून बसा असा संदेश बाबजी मामाने दिला आहे. याप्रमाणेच उटगी या गावी कुटुंब नियोजनासाठी कांही लोक येतात, तेंव्हा या लोकांना घाबरुन 'मारकांडी गासकली खपला' असे म्हणून सर्वानां पळून जाण्याचा इशारा मारुती मामाने दिला आहे. आपल्याकडे बारसे करण्याच्या विधीला त्यांच्याकडे 'व्हरी बसवणे' म्हणतात. म्हसोबासाठी 'झटिंगा' असे म्हणतात. 'भांबा आणि हाडप' ही शब्द योजना त्यापैकीच आहे. या प्रमाणेच भिक मागायला गेल्यानंतर 'जय चालतयां, येश मिळतयां, लक्ष्मी पवतीयां, द्वंद वाढतयां' असे म्हणून भीक मागितली जाते. अशा प्रकारे या समाजाने आपले एक भाषिक वेगळेपणे जाणीवपूर्वक जपलेले आहे.

'गबाळ' या आत्मकथनातील प्रेरणांचा विचार केल्यानंतर या प्रेरणांच्या स्वरुपाचाही विचार करावा लागतो. या प्रेरणा स्वरुपाचा विचार करीत असताना, खालीलप्रमाणे विविध स्वरुपे लक्षात येतात.

१) **सामुहिकता :** या लेखनातून 'कुडमुडे जोशी' समाजाच्या भणंग, लाचार, दरिद्री व्यसनाधिन वर्षानुवर्ष हात पसरुन इतरांच्या दारात उभे असलेल्या या बरोबरच अनेक अनिष्ठ रुढी, परंपरा, अज्ञान आणि दारिद्र्याचे जीवन जगत असणाऱ्या समाजाचे चित्र नजरेसमोर येते.

हा समाज आठ - दहा कुटुंबाच्या संख्येतच गावोगाव हिंडतो. कोणतेही एकटे कुटुंब जगायला जात नाही. ही आठ - दहा कुटुंबे जगायला गेल्यानंतर प्रत्येकाच्या अडीअडचणी, संकट समयी मदतीचा हात एकमेकाशी पुढे करतात. पांडुरंग आजोबा अजारी असताना त्यांना मुलगा नाही म्हणून त्यांच्या समाजातील सर्व कुटुंब प्रमुखांनी आरग या गावी मासे पकडून आणल्यानंतर थोडे थोडे मासे त्यांच्याकडे पाठविले आहेत. बावची गावी यात्रेसाठी गेल्यानंतर त्यांच्या मुलीला वर्गणी गोळाकरुन पैसे दिलेले आहेत. त्यांचे श्राध्द ही वर्गणी गोळा करुन केलेले आहे. विमल बाळातीण होत असताना स्व:ताच्या मुलीप्रमाणे प्रत्येकाने तीची काळजी घेतलेली आहे. संध्याकळी जेवण करत असताना प्रत्येकजण शेजाऱ्याला बोलावतो. लेखकाच्या वडिलांना नागू आजोबा वेळोवेळी आर्थिक मदत करतात. बावची गावी मरगम्मा देवीची यात्रा करण्यासाठी जाताना सर्वजण मिळून जातात. लेखक जेंव्हा उन्हाळी सुट्टीसाठी गबाळाकडे जातो. तेंव्हा त्याची सर्वजण अस्थेने चौकशी करतात. लेखक सांगलीला शिकत असताना जयवंत मोरे या त्यांच्या जातीतील पोलिसाने खूप मदत केलेली आहे.

२) **आशावादी दृष्टिकोन :** हे आत्मकथनातिल निरनिराळ्या घटना प्रसंगाचा अभ्यास करीत असताना कुडमुडे जोशी समाजाच्या व्यथा वेदना बरोबरच हा समाज वर्षानुवर्ष लाचारीत कशाप्रकारे दिवस ढकलीत आहेत. ताठ मानेने जात पंचायतीचा न्याय निवाडा करणारे या समाजातील न्यायाधीश इतर समाजातील व्यक्तिर्नी आपल्या समाजातील व्यक्तिवर हात उचलला, अन्याय केला तर मात्र हात जोडून विनवणी करुन त्याला सोडवून आणतात. अशाप्रकारे अनेक संकटे, अपमान, दारिद्र, लाचारी व उपवास अवहेलना सहन करुन ही ते जीवनाकडे आशावादी दृष्टिनेच पाहतात.

लेखकाचे वडिल स्वत: भीक मागतात पण लेखकाला वह्यापुस्तके घेण्यासाठी पैसे देतात. मानकाई रोजगार हामीच्या कामावर जाऊन, छोट्या छोट्या वस्तूचा व्यापार करुन लेखकाला जेवण पाठवते. भोसे या गावी असताना लेखकाचे पास - नापास पाहण्यासाठी लेखक जतला निघतो पण पैसे नसलयामुळे त्याचे वडिल कुरकुर करतात. पण त्यांची आई म्हणते की, ' हि दिसं काय

आसचं राहत्याती ? जात्यालागी कवातर, आतापातूर त्येनं हाल खावून शिक्षण शिकलयं ते काय मातीत घालाचं' पृ.१५८ असा अशावादी दृष्टिकोन ती व्यक्त करते. येदू तात्याही भीक मागून आपल्या मुलाला शिकवतात. स्वत: लेखक जत मध्ये गटारी उपसतात इतर हलकी सलकी कामे करतात. कुठेही ते थांबत नाहीत. संकटाशी झगडतात. जिद्द बाळगून शिक्षण घेतात. मरगम्मा देवीची सर्वजण मिळून जत्रा, पालजत्रा करतात म्हणजेच जगदीश खेबूडकर यांच्या शब्दांत -

'दिस येतील, दिस जातील भोग सरल सुख येईल'

या न्यायाने ते जीवनाकडे पाहतात.

३) **रुढी आणि परंपरा प्रियता :** हा समाज वर्षानुवर्ष रानात हिंडत असला, अज्ञानी असला, अशिक्षित असला, भीक मागून उदरनिर्वाह करीत असला, गरीबी आणि दारिद्रय यांची सोबत आहे म्हणून धर्माच्या रुढी-परंपरा आणि संस्कृतीला त्यांनी सोडलेले नाही. लग्न जमल्यानंतर लग्न समारंभ थाटात साजरा करतात, आनंदाने जेवण देतात, नित्य नियमितपणे गावच्या यात्रेला हजर राहतात, पाल जत्राही करतात नवे कपडे घेतात. रानावनात ही जन्म, बारसे, मर्तिक इ. प्रसंग कोणतीही काटकसर न करता ते साजरे करतात. बिऱ्हातील एखाद्या कुटुंबावर संकट आले तर प्रत्येक जण झीज सोसून मदत करतात. दररोज जेवण करताना इतरांना बोलवतात.

लेखक आपल्या आई वडिलांचा शोध घेत अथणी या गावी आल्यानंतर गावाच्या शेजारी कांही कुटुंबे पाल मांडून राहिल्याचे त्यांना दिसते. ते आनंदीत होवून त्या पालावर जातात पण ही पाले गोसावी समाजाची असतात. तेंव्हा ते खूप नाराज होतो व आपल्या आई वडिलांची चौकशी करतात, त्यावेळी त्यातील एका म्हाताऱ्यांनी जेवण दिले, तेंव्हा त्यांनी त्या म्हाताऱ्याचे आभार व्यक्त केल्यानंतर तो म्हातारा म्हणतो 'न्हा - न्हाय पोरा ... ऊ.. ऊपकार कसंल मा... मानसांन मानसाच्या येळला व्हु ... व्हुयाचं न्हाय तर मानूस कसलं' ? पृ.१३८ अशाप्रकारे दारिद्र्याशी अज्ञानाशी सतत सामना करीत असताना सुध्दा या समाजाने माणुसकी, संस्कृती, परंपरा जपलेल्या आहेत.

४) **नव्या बदलाची जाणीव :** कुडमुडे जोशी समाज पोटासाठी भटकतो, दारिद्रयात आयुष्य घालवतो, अवहेलना लाचारी स्विकारतो हे जरी खरे असले तरी हे सर्व परंपरचे दणे त्यांच्या वाट्याला आले असले तरी, या जीवनाचा त्यांना आता ऊबग आला आहे. हे लाचार, भणंग, भिकार जीवन त्यांना थांबवायचे आहे. त्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. पण शासकीय अधिकारी आणि त्यांच्या योजना

त्यांच्यापर्यंत पोचत नाहीत, इतर समाज त्यांना स्विकारत नाही. त्यामुळे या जीवनात त्यांना खितपत पडावे लागले आहे.

असे असलेतरी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तळागाळातल्या या समाजात एक वेगळी जाणीव निर्माण झाली आहे. म्हणून दादासाहेब मोरे शिक्षण घेऊन उच्च पदावर विराजमान होतात. आपल्या कुटुंबातील खाणारे तोंडे वाढत आहेत, म्हणून आपल्या आईचे कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन करतात. तात्यासाहेबला व्हन्नुर या गावच्या आश्रम शाळेत ठेवतात. येदू तात्याचा मुलगा ही सांगलीला सायंन्स विभागात शिकतो, लेखकाचा मावस भाऊ ही शिकतो. लेखकाचे चुलत काका भगवानराव मोरे यांनाही शिक्षणाची आवड आहे. एकनाथराव मोरे हे ही अनेक संकटांना तोंड देऊन शिक्षण घेऊन हेडमास्तर होतात. भगवान तात्याचा राजू ही विलिंग्डन कॉलेजमध्ये शिकतो. गोंधळेवाडीची जयवंत मोरे सांगलीला पोलिसदलात नोकरी करतात. स्वत: लेखक वेळोवेळी नाट्य संस्थातून कामे करुन शिक्षणासाठी पैसे मिळवतात.

अशाप्रकारे हा समाज आडाणी अशिक्षित असलातरी प्रगत जीवनाची औद्योगीकी करणाच्यागतीची त्यांना कल्पना आहे. त्याप्रमाणेच आपल्या मुलांनी हे लाचार, भणंग, भिकार जीवन न जगता नागरी समाजातील माणसांप्रमाणे शहाणे व्हावे शिकावे याकडेही या समाजाचे लक्ष आहे. शिक्षण घेऊन जी कुटुंबे नोकरीला लागली आहेत. नागरी जीवनात रुळलेली आहेत. ती कुटुंबे इतरांना मदत करीत आहेत. म्हणजेच समाज जीवनातील नव्या बदलाची जाणिव या समाजाला आहे असेच आपणाला दिसून येते.

'गबाळ' या आत्मकथनाच्या लेखनाची प्रेरणा व स्वरुप लक्षात घेतल्यानंतर लेखकाने या आत्मकथनातून आपल्या शैक्षणिक प्रगतीचा प्रवास व हा प्रवास करीत असताना आपल्या वाट्याला आलेली दु:खे, अवहेलना, लाचारी सांगितलेली आहे. याबरोबरच आपल्या समाजाचे भणंग, भिकार जीवनाच चित्रण ही केलेले आहे. आपले आई वडिल वर्षातील आकरा महिने गावोगाव भिक्षा मागतात. दरवर्षी एका मुलाला जन्म देतात. त्यामुळे नवनवीन समस्या निर्माण होतात. तरी कुठे न कुरकुरता जीवनाचा अस्वाद घेतला जातो. आषाढ महिन्यात गावी येऊन घरे सारवायची, शेकारायाची आणि गावोगाव हिंडून जमविलेले दारु पिऊन, पाल जत्रा करुन उडवायचे. मानपानासाठी भांडयचे, दांडीमांडी कलमानुसार शिक्षा भोगायची, पदर पसरायचा आणि दिवस उगविल्याबरोबर गळ्यात भांबा, हातात पंचा हाडप घेऊन भिक्षेसाठी दारोदार हिंडायचे ही आपल्या समाजाची जीवन जगण्याची

अजब तऱ्हा वर्णन केलेली आहे. यातून दादासाहेबाच्या शांत सहनशील, सोसिक व समजूतदार स्वभावाचे दर्शन घडते. आपल्या वाट्याला जे जीवन आले ते जीवन त्यांनी न कुरकुरता जगलेले आहे. दारिद्रयात वारंवार संकटे आल्यावर मनुष्य अकालीप्रौढ होतो. तसेच दादासाहेबाचे झाले आहे. कारण त्यांनी आपला संताप चीड, राग, द्वेष, कोणा विषयी मत्सर भावना कुठेही व्यक्त केलेली नाही. त्यांची कर्तव्यबुध्दी जागृत आहे. कर्मावर त्यांची निष्ठा आहे. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन आशावादी आहे. प्रगतीच्या दिशेने त्यांची वाटचाल आहे. प्रचंड नम्रता त्यांनी अंगी बाणवली आहे. 'सुख दु:खाचे अकाऊंट समान असल्याशिवाय जीवनाचा बॅलन्सशीट कसा टॅली होणार' पृ.१७५ अशा प्रत्येक समस्येकडे पाहण्याची त्यांची विचारधारा आहे. आपल्या ध्येयाशी ते प्रामाणिक आहेत. शहरी झगमगाट व आंबट शौकीनाचा चैनीपणा या जादूगारी दुनियेपासून ते लांब आहेत. श्रीमंत मित्रांची मैत्री लाभूनही त्यांनी डोक्यामध्ये हवा शिरु दिली नाही. वास्तवाशी ते प्रामाणिक आहेत. आपल्या गरीबीचे त्यांनी भांडवल केले नाही. म्हणून 'अत्यंत प्रवाही शैलीत लिहीलेल्या आणि एक नवे समाज दर्शन घडविणाऱ्या या लेखनाकडे समिक्षकांनी, अभ्यासकांनी मात्र फारसे लक्ष दिले नाही'.[३] ही प्रा. डॉ. सौ. कुसरे कुलकर्णी यांनी केलेली तक्रार रास्त वाटते.

या आत्मकथनाने एक मोलाचे भर मराठी साहित्यात पडलेली आहे. परंतू या आत्मकथनाला कांही मर्यादा पडलेल्या आहेत. या मर्यादांचा विचार करताना आपणाला असे दिसते की, लेखकाने फक्त आपल्या जीवनातील शैक्षणिक व स्वजातीची जीवन जगण्याची शैली वर्णन केलेली आहे. खरे तर आज उच्च पदावर काम करीत असणाऱ्या या लेखकाने आपल्या समाजातील दु:खाबरोबरच महाराष्ट्रातील तळागाळातील जमातीच्या दु:खाला वाचा फोडायला हवी होती. एक विश्वात्मक प्रगल्भ सामाजितक दृष्टिकोन ठेवून लेखन करायला हवे होते. पण इथे मात्र 'स्व' आणि 'स्वसमाज' यांचेच वर्णन येते. त्यामुळे एक प्रकारचे संकुचितपणा जाणवतो.

यानंतरची मार्यादा म्हणजे या आत्मकथनात आपल्या समाजाची भटकंती होत असताना भटकंती झालेल्या गावच्या वर्णनातच या पुस्तकाची पाने खर्ची पडलेली आहे. शैक्षणिक प्रवास सांगताना 'पाल काढणे, भीक मागणे, डबा आणणे, शाळेला जाणे, अभ्यास करणे इ.वर्णने वारंवार आल्याचे दिसतात. वाढत्या वयाबरोबर निसर्ग क्रमानुसार शरीरात जे बदल होतात. भाव भावनांचा जो विकास होतो. रंगभूमीवर मुलीबरोबर काम करीत असताना देखील त्यांची वृत्ती शांत आहे. हे वर्णन निसर्ग क्रमाला नाकारणारे आहे'.[४] ही श्री. वासुदेव मुलाटे यांनी केलेली तक्रास रास्त वाटते. शिक्षण घेत असताना दलित म्हणून ज्या स्कॉलरशिपने मदत केली, सवलती मिळाल्या किंवा डॉ.

आंबेडकरासारख्या प्रेरणादायी नेतृत्त्वाबद्दल, स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या विविध चळवळीबद्दल त्यांनी एक अक्षरही लिहिले नाही. हरिष, बाळू कांबळे इ. मित्रांच्या पलिकडे ते गेले नाहीत.

अशा प्रकारे एक वेगळे जीवन या आत्मकथनातून समाजासमोर आले. त्याबरोबरच पिढ्यांपिढ्या बकाल, पशुसादृष्य, लाचार, आगतिक जीवन जगणाऱ्या जमातीतील एका ध्येय वेड्या मुलाचे प्रकाशा प्रत मार्गक्रमण करीत राहणे. प्रशंसनीय वाटते. भाषेचा फुलोरा, कल्पनेचे फुगे यांचा वापर न करता संथ वास्तवाभिमुख अशा साध्या लेखन शैलीतून 'गबाळ' अवतरले आहे. ही जमेची बाजू आहे.

# संदर्भ टिपा


१) सहा दलित आत्मकथने एक चिंतन - डॉ. वासूदेव मुलाटे कैलास पब्लिकेशन्स, गोकुळ वाडी, औरंगपुरा, औरंगाबाद प्र. आवृत्ती १९८५ पृ. २

२) उ.नि. - पृ. ५.

३) दलित स्वकथने साहित्यरुप - प्रा. सौ. आरती कुसरे कुलकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९१ पृ. ७८

४) उ.नि. - पृ.९४